Estd. 1962
"A" Re accredited By
NAAC (2014)
With CGPA (3.16)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे. –

1. He/ She should have served as Programme Co-odinator in the University of Programme Officer in a college at least for four years continuously.
2. He/She should possess the academic qualifications for being appointed as Programme Co-odinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.
3. He/She should have interest in Youth work in particular and social work general.
   तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.
4. संपर्क अधिकारी हे पद रिडर स्केल (सुधारित वेतनश्रेणी) रुपये 37400 – 67000 ए.जी. पी. 9000 या संवर्गातील राहील.
5. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभूत्व असावे.
6. पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पध्दतीने प्रथमतः एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तिचा कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.
7. पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचा–यांचे रजेचे नियम लागू होतील.
8. पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रतिनियुक्ती पध्दतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही. आणि म्हणून त्या व्यक्तिला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowances) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणी महाराष्ट्र नागरी नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.
9. पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवा योजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापीठांना वेळेवर अनूदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परीक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिध्द सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.
10. पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वतःला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल. त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

पान 2 वर

विद्यापीठाच्या सर्व अधिविभागातील आणि संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षकांना आदेशान्वये कळविण्यात येते की. वरील अटी विचारात घेऊन अर्ज करण्यास इच्छुक असणा—या व पात्र उमेदवारांनी दि. 20/11/2015 रोजी किंवा त्यापूर्वी अर्ज विद्यापीठाकडे सादर करावेत संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षकांनी अर्ज प्राचार्यामार्फत विद्यापीठाकडे सादर करावेत.

संलग्नीत महाविद्यालयातील अर्जदार शिक्षकांच्याबाबत अर्जासोबत संबधित प्राचार्यांनी अर्ज अग्रेषित करताना खालील तक्त्यामध्ये अर्जदारांची माहिती विद्यापीठाकडे सादर करावी.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | कार्यरत असलेल्या महाविद्यालय/ विद्यापीठाचे नांव | जन्म दिनांक | प्रथम नियुक्ती दिनांक | शैक्षणिक अर्हता | गोपनीय अहवालाची प्रतवारी वर्षेनिहाय | रुपये 374000—37000 ए.जी.पी 9000 या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती केलेला दिनांक | विद्यापीठामध्ये किंवा महाविद्यालयामध्ये कार्यक्रम अधिकारी पद धारण केलेला दिनांक | विद्यापीठाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**आदेशावरून,**

—स्वाक्षरी—

**प्र. कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/पीजी/4281**

**दिनांक : 09 नोव्हेंबर, 2015**

प्रति,

1) विभागप्रमुख/संचालक/समन्वयक
विद्यापीठ अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

2) प्राचार्य,
संलग्नीत महाविद्यालये,
— सर्व शिक्षकांच्या निदर्शनास उपरोक्त परिपत्रक आणण्यात यावे.